No 28447

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र. ११/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : 10 OCT 2019

# परिपत्रक

**विषय : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदर क्षेत्रातील मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुट्टी अथवा दोन तासांची सवलत देण्याबाबत.**

**संदर्भ** :उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, शासन परिपत्रक क्र. मतदान २०१९/प्र.क्र.७३/कामगार-९ दि.२५.०९.२०१९.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी संदर्भांकित दि. २५.०९.२०१९. च्या परिपत्रकान्वये सार्वत्रिक विधानसभा निवडणूकांच्या मतदार संघात सार्वजनिक सुट्टी अथवा दोन तासांची सवलत जाहीर केलेली आहे. सदर, आदेश भारत निवडणूक आयोग यांचे क्र.ECI/PN/८३/२०१९, दि. २१.०९.२०१९ रोजीच्या प्रसिद्धी पत्रकास अनुसरून जाहिर करण्यात आलेले आहे. सोबत महाराष्ट्र शासन यांचे दि. २५.०९.२०१९ रोजीचे, परिपत्रक माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव जोडलेले आहे.

२. विधानसभा सर्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार संघातील संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना मतदानाकरिता दि. २१.१०.२०१९ रोजी मतदानाचा हक्क बजावण्याकरिता भरपगारी सुट्टी किंवा आपवादात्मक परिस्थितीत अधिकारी/कर्मचारी पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर सुट्टी ऐवजी केवळ दोन ते तीन तासांची सवलत देण्याबाबत, सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या मंजुरीनुसार सर्व संबंधित अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, शासन परिपत्रक दि. २५.०९.२०१९ मधील आदेशांचे अवलोकन करून त्याचे काटेकोर पणे पालन करावे.

३. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

सोबत : वरील प्रमाणे.

कमांडर शिवाजी इंदलकर (से.नि.)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

C:\Users\Administrator\AppData\Local\Microsoft\Windows\Temporary Internet Files\Content.Outlook\C49QXRS7\Circular Holiday for Election.doc

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदर क्षेत्रातील मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुट्टी अथवा दोन तासांची सवलत देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,**

**शासन परिपत्रक क्रमांक मतदान २०१९/प्र.क्र.७३/कामगार-९**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २५ सप्टेंबर, २०१९

<u>संदर्भ</u>:- भारत निवडणूक आयोग यांचे क्र.ECI/PN/८३/२०१९, दि.२१ सप्टेंबर,२०१९ रोजीचे प्रसिध्दी पत्रक

<u>शासन परिपत्रक</u>

आपल्या देशातील लोकशाही पध्दतीनुसार १८ वर्षावरील नोंदणी झालेल्या सर्व नागरिकांनी प्रत्येक निवडणुकीमध्ये १०० टक्के मतदान करणे अपेक्षित आहे. ही बाब लक्षात घेता लोकप्रतिनिधीत्व कायदा,१९५१ (भाग-२) मधील नियम १३५ (ब) नुसार मतदानाच्या दिवशी सर्वसाधारणपणे मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात येते किंवा काही ठिकाणी कामाच्या तासात योग्य ती सवलत देण्यात येते. मात्र गेल्या काही निवडणुकांमध्ये असे दिसून आले आहे की, संस्था/ आस्थापना इ. भरपगारी सुट्टी किंवा सवलत देत नाहीत. यामुळे अनेक मतदारांना त्यांच्या मतदानापासून वंचित रहावे लागते, जे लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे.

२. भारत निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे महाराष्ट्रातील २८८ विधानसभा क्षेत्रांमध्ये दिनांक २१ ऑक्टोबर, २०१९ रोजी निवडणूक घेतली जाणार आहे. या निवडणुकीमध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्यरितीने बजावता यावा यासाठी खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

I) निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार/अधिकारी/कर्मचारी यांना मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी.

II) सदर सुट्टी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने,दुकाने इत्यादींना लागू राहिल(उदा.खाजगी कंपन्या या मधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाटयगृहे, व्यापार,औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स इ.)

III) अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी केवळ दोन ते तीन तासांची सवलत देता येईल. मात्र त्याबाबत त्यांनी संबंधित जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहिल. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन ते तीन तासांची भरपगारी सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहिल.

IV) वर नमूद केल्यानुसार उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाअंतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींच्या मालकांनी/व्यवस्थापनाने वरील सूचनांचे योग्य ते अनुपालन होईल याची काटेकोरपणे

खबरदारी घ्यावी. मतदारांकडून मतदानाकरिता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबत तक्रार आल्यास, त्यांच्याविरुध्द योग्य कारवाई करण्यात येईल.

४. सदर परिपत्रक भारत निवडणूक आयोग यांचे क्र.ECI/PN/८३/२०१९, दि.२१ सप्टेंबर,२०१९ रोजीच्या प्रसिद्धी पत्रकास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९२५१५१७३५००१० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dr.Shrikant L.
Pulkundwar

Digitally signed by Dr.Shrikant L. Pulkundwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=feb24b5f5d1512bb47f7bae5ad1db4953358cd43c999bdf0814c6bb78364d50a, serialNumber=c10a1e6c8fbe08c1180978bd3ed8a151ed05202d522b09b9960341c2f080906d, cn=Dr.Shrikant L. Pulkundwar
Date: 2019.09.25 15:19:13 +05'30'

**( डॉ.श्री.ल.पुलकुंडवार )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत- उपरोक्त परिपत्रक सर्व संबंधित आस्थापनांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह अग्रेषित.

१. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र,नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई-३२
२. प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३. कामगार आयुक्त, वांद्रे, मुंबई-५१ (निवडणूक होणाऱ्या ठिकाणी संबंधितांना सुचना देण्याबाबत कार्यवाहीच्या विनंतीसह अग्रेषित)
४. संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, वांद्रे, मुंबई (निवडणूक होणाऱ्या ठिकाणी संबंधितांना सुचना देण्याबाबत कार्यवाहीच्या विनंतीसह अग्रेषित)
५. संचालक, बाष्पके, वांद्रे, मुंबई,(निवडणूक होणाऱ्या ठिकाणी संबंधितांना सुचना देण्याबाबत कार्यवाहीच्या विनंतीसह अग्रेषित)
६. आयुक्त, सर्व जिल्हे,महाराष्ट्र राज्य.
७. जिल्हाधिकारी,सर्व जिल्हे,महाराष्ट्र राज्य.
८. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय,मुंबई यांना व्यापक प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह अग्रेषित.
९. कामगार विभागातील सर्व कार्यासने

**प्रत माहितीसाठी :**

१ मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
२ मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
३ मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.